# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः27.07.2024** **वारःशनिवार**

---

**ठळक बातम्या**

१. पॅरीसमध्ये ऑलिंपिक्स स्पर्धांना प्रारंभ, पुरुष हॉकी आणि महिलांच्या बॉक्सिंग क्रीडा प्रकारात भारतीय खेळाडू आज आपलं  क्रीडा कौशल्य आजमावणार

२. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत निती आयोगाच्या प्रशासन परिषदेची बैठक

३. नीट युजी परीक्षेच्या सुधारित अंतिम गुणपत्रिका जाहीर

४.महिलांच्या टी 20 आशिया चषक स्पर्धेत भारत अंतिम फेरीत, विजेतेपदासाठी उद्या श्रीलंकेशी लढत

५. देशभरात कमी अधिक प्रमाणात सर्वत्र पावसाचा हवामान विभागाचा अंदाज.

**ऑलिम्पिक**

मुसळधार पाऊस असतानाही पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेचा उद्घाटन सोहळा काल मोठ्या दिमाखात पार पडला. देशोदेशीच्या खेळाडूंच्या पथकांनी मैदानात नेहेमीच्या प्रथेपेक्षा वेगळ्या पद्धतीनं  संचलन केलं. जवळपास सात हजार खेळाडूंनी पॅरिसमधल्या सीन नदीतून बोटीतून येऊन उपस्थितांना अभिवादन केलं . ज्युदोमध्ये तीन वेळा विजेता ठरलेला टेडी रायनर यानं ऑलिम्पिक ज्योत प्रज्वलित केली. भारताच्या पथकाचं नेतृत्व पीव्ही सिंधू आणि शरत कमल यानी केलं. यावेळच्या स्पर्धेचं एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पदक विजेत्या खेळाडूला पदकासोबत प्रसिद्ध आयफेल टॉवरच्या उभारणीसाठी वापरलेल्या मूळ लोखंडाचा तुकडा देऊन गौरवलं जाणार आहे. आजपासून स्पर्धाना सुरुवात होत असून जगभरातील 7000 खेळाडू यामध्ये सहभागी झाले आहेत. पुरुष एकेरी रोइंग, 10  मीटर एअर रायफल मिश्र दुहेरी, 10 मीटर एअर पिस्तूल पुरुष आणि महिला एकेरी स्पर्धा, टेनिसमध्ये पुरुष दुहेरी स्पर्धा, बॅडमिंटन क्रीडा प्रकारात पुरुष एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी गटात, तर टेबल टेनिस क्रीडा प्रकारात पुरुष एकेरी गटात, पुरुष हॉकी आणि महिलांच्या बॉक्सिंग क्रीडा प्रकारात भारतीय खेळाडू आज आपलं  क्रीडा कौशल्य आजमावतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे भारतीय पथकातील खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**मोदी-अर्थसंकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमो ॲपवर 2024 च्या अर्थसंकल्पाची रूपरेषा सामायिक केली आहे. या रुपरेषेत रोजगार निर्मिती आणि कौशल्या संबंधित विविध सरकारी घोषणा, योजना आणि नवीन उपक्रमांची सोप्या पद्धतीनं माहिती देण्यात आली आहे.

2024 च्या अर्थसंकल्पाचं उद्दिष्ट रोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या योजनांसह नवीन रोजगार निर्माण करणे, एक मजबूत आणि कार्यक्षम कर्मचारी बल तयार करणे आणि रोजगार निर्मात्यांना सक्षम करणे हा आहे असं मोदी यांनी समाज माध्यमा वरील एका संदेशात म्हटलं आहे. नमो ॲपवरील ‘व्हॉट्सॲप इट’ विभागात ही अर्थसंकल्पाची रूपरेषा पाहता येईल. कौशल्यावर आधारित उपक्रम, अंतर्गत शिक्षण आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी सरकारची वचनबद्धता अधोरेखित करून अर्थसंकल्पात प्रामुख्यानं शिक्षण, रोजगार आणि कौशल्यासाठी जवळपास दीड लाख कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

**नीति-आयोग**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रात निती आयोगाच्या९ व्या प्रशासन परिषदेची बैठक होणार आहे. विकसित भारत @2047 हा या वर्षीच्या बैठकीचा मुख्य विषय असून त्यामध्ये भारताला विकसित बनवण्याचा मुद्दा सर्व चर्चांमध्ये केंद्रस्थानी असणार आहे. विकसित भारताचं ध्येय साकार करण्याच्या धोरण मसुद्यासंबंधीच्या दृष्टिकोनाबद्दलही बैठकीत विचारविनिमय केला जाणार आहे.

**पुन्हा-नीट**

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात NTA नं काल राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षा अर्थात नीट युजी परीक्षेच्या सुधारित अंतिम गुणपत्रिका प्रसिद्ध केल्या आहेत. नीट परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर आपला निकाल आणि गुणपत्रिका पाहता येतील. या परीक्षेत 17 उमेदवारांनी पहिला क्रमांक पटकावला असल्याची माहिती एनटीएनं दिली आहे. यावर्षी 5 मे रोजी देशातील 571 शहरांमधल्या 4750 हून अधिक केंद्रांवर झालेल्या या परीक्षेला 24 लाखांच्यावर विद्यार्थी बसले होते. परीक्षेवेळी ज्या 1563 विद्यार्थ्यांचा वेळ वाया गेला होता, त्यांची 23 जूनला फेरपरीक्षा घेण्यात आली .

**डिजीलॉकर**

देशातील 30 कोटींहून अधिक नागरिक सध्या डिजीलॉकर सुविधेचा लाभ घेत आहेत, तसंच सरकारी संस्थांनी डिजीलॉकरच्या इलेक्ट्रॉनिक फॉर्मटमध्ये आतापर्यंत 675 कोटी ई-दस्तऐवज जारी केले

आहेत, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री जितीन प्रसाद यांनी काल राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली . डिजीलॉकर सुविधेच्या माध्यमातून नागरिकांना त्यांनी महत्त्वाची कागदपत्रं आणि प्रमाणपत्रं डिजिटल मंचावर  सुरक्षितपणे ठेवता येतात. याआंतरराष्ट्रीय सुरक्षा मानकांचं पालन करण्यासाठी अत्याधुनिक उपायांचा काटेकोरपणे अवलंब करण्यात येत असल्याचंही प्रसाद यांनी उत्तरात म्हटलं आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या आकाशवाणी वरच्या मन की बात या कार्यक्रमातून उद्या सकाळी 11 वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या माध्यमातून  देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा मन की बात चा 112 वा भाग आहे.

**कलाम**

माजी राष्ट्रपती आणि ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अबद्ल कलाम यांची आज 9 वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त त्यांना देशभर आदरांजली वाहण्यात येत आहे. भारताच्या अंतराळ आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमात त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानामुळे त्यांना मिसाईल ऑफ इंडिया म्हणून ओळखलं जातं.

**चोरलेला-वारसा**

भारतातून चोरून नेलेल्या प्राचीन कलाकृती देशात माघारी आणण्यासाठी भारत आणि अमेरिका यांच्यात काल सांस्कृतिक संपदा करार करण्यात आला. या करारानुसार दोन्ही देश पुरातन आणि सांस्कृतिक साहित्याचा बेकायदा व्यापार, आयात, निर्यात, चोरटी वाहतूक रोखण्यासाठी एकमेकांसोबत काम करतील. भारतानं अमेरिकेशी केलेला हा पहिलाच सांस्कृतिक संपदा करार आहे. गेल्या वर्षी भारतात झालेल्या जी-20 शिखर परिषदेपासून उभय देशांमध्ये वर्षभर चाललेल्या चर्चेनंतर हा करार अस्तित्वात आला आहे. न बेकायदेशीर मार्गानं नेण्यात आलेला आपल्या प्राचीन कलाकृतींचा ठेवा परत मिळवण्याचा देशाला हक्क असल्याचं मंत्र्यांनी या कराराबाबत माहिती देताना सांगितलं.

**चलन गंगाजळी**

रिझर्व्ह बँकेनं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, 19 जुलैला संपलेल्या सलग तिसऱ्या आठवड्यात परदेशी चलन गंगाजळीत भर पडल्यानं भारताचा परदेशी चलन साठा 671 पूर्णांक 86 बिलियन डॉलर्स या आजवरच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. त्यापूर्वीच्या सलग दोन आठवड्यांमध्ये मिळून परदेशी चलन गंगाजळीत जवळपास 15 बिलियन डॉलर्सनी वाढ झाली होती. 2023-24 या आर्थिक वर्षात भारताची चालू खात्यातील तूट सकल देशांतर्गत उत्पन्न अर्थात जीडीपीच्या 7 दशांश

टक्के म्हणजेच 23 पूर्णांक 2 दशांश बिलियन डॉलर्सनी कमी झाली होती. ही आकडेवारी देशाची परदेशातील व्यापाराची स्थिती चांगली असल्याचं द्योतक आहे.

**एडीपीसी**

आशिया आपत्ती तयारी केंद्र म्हणजेच एडीपीसीच्या अध्यक्षपदाची सूत्रं काल भारतानं हाती घेतली. एडीपीसी ही स्वायत्त आंतरराष्ट्रीय संस्था आहे. आपत्ती जोखीम कमी करण्यासाठीच्या कार्यान्वयन आणि सहकार्य करणं तसंच आशिया आणि प्रशांत महासागर क्षेत्रात हवामान अनुकूलन साधण्याच्या कामी ही संस्था योगदान देते, असं केंद्रीय गृह खात्यानं सांगितलं. भारताखेरीज शेजारील बांग्लादेश, कंबोडिया, चीन, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपिन्स,श्रीलंका आणि थायलंड हे आठ देश या संस्थेचे सदस्य आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाचे सदस्य राजेंद्र सिंह यांनी भारत सरकारचे प्रतिनिधी या नात्यानं काल थायलंड मध्ये बँकॉक इथं चीनकडून एडीपीसी च्या 2024-25 या वर्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली.

**महिला टी-20**

महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं बांगलादेशचा 10 गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. गत विजेत्या भारतीय संघानं बांग्लादेशचं 81 धावांचं आव्हान केवळ 11 षटकांत पूर्ण केलं. भारताची सलामीवीर स्मृती मंधाना हिनं 39 चेंडूत 55 धावा केल्या. तर यजमान श्रीलंकेनं पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात 3 गडी राखून दमदार विजय प्राप्त करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यामुळे स्पर्धेचा अंतिम सामना उद्या भारत आणि श्रीलंका यांच्यात होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं मध्य महाराष्ट्र, विदर्भ, कोकण, गोवा, दक्षिण कर्नाटकाचा अंतर्गत भाग, मराठवाडा,मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड राज्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. असाच पाऊस सौराष्ट्र, कच्छ आणि गुजरातच्या काही भागातही सोमवार पर्यंत असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. उत्तराखंड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, केरळ, जम्मू काश्मीर, लडाख आणि गिलगिट भागातही मुसळधार पाऊस राहील. पुढच्या पाच दिवसात देशात सर्वत्र, मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. पुढील 2 दिवस आसाम आणि त्रिपुरा राज्यात मात्र उष्ण आणि दमट वातावरण राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**